॥ श्री ॥
॥ बाबा ॥

माझ्या मायेची प्रेमाची,प्रितीची,वाग्जाई
माझी कुलस्वामिनी,आई वाग्जाई देवी
संतकृपेने या पिढी,भेट ही घडविली ॥धृ॥

आलीस तू आमच्या घरी स्वइच्छे गौरीपूजनाच्या दिवशी
नाचूनी खेळूनी दंगवूनी रंगविले आम्हासी
दिले शाश्वत वचन कुळ मी उध्दरीन ॥1॥

म्हणू मी तुजला,सगुण की निर्गुण
देही राहूनी,माझे आई ,हो तू कार्यकारीणी
अनुसंधान,नामस्मरण,दृढ करुनी घेई ॥2॥

नाही कणभर,अधिकार,माझा या देहावरी
काय करशील ते होईल रुज तुझ्या नावावरी
शिव-शक्ती मिलाप अखेर तुच धडवूनी आणशी ॥3॥

नामस्मरण - नामस्मरण आर्ततेने होवो
शुध्द प्रिती अखंड जडुनी राहो
देहाबुध्दी वासना जाळे समूळ भेदूनी टाक ॥4॥

★★★★★